कृषि विभागातील मृद संधारण व पाणलोट व्यवस्थापन शाखेतील तसेच वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेतील पदे तसेच इतर पदे मृद संधारण व जलसंधारण विभागास हस्तांतरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र. आकृवि-०८१७/प्र.क्र.२६८/१५ अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-१२/०९/२०१७.

<u>वाचा :</u>-१) शासननिर्णय,कृषि व पदुम विभाग,क्र.आकृवि-१२०८/प्र.क्र.७२/१५अे,दि.२२/०५/२००९
२) शासन निर्णय,जलसंधारण विभाग,क्र.आरस्थाप २०१६/प्र.क्र.८८(भाग-९)/जल-२, दिनांक ३१मे,२०१७

<u>प्रस्तावना :-</u>

जलसंधारण विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये मृद व संधारण विभागाची स्थापना करण्यात आली आहे.त्यामध्ये नमूद केल्यानूसार मृद व जलसंधारण विभागाचा एकुण आकृतिबंध १६४७९ पदांचा दर्शविण्यात आला असून त्यामध्ये त्या विभागाने कृषि विभागाची एकुण ९९६७ पदे वर्ग करण्याबाबत नमूद केले आहे. यासंदर्भात दिनांक २१/७/२०१७ रोजी झालेल्या वरिष्ठ स्तरावरील बैठकीमध्ये जलसंधारण विभागाने कृषी विभागाची पदे वर्ग करण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची गरज असल्याचे मान्य होऊन यासंदर्भात मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली कृषि व जलसंधारण विभागाने आकृतिबंधाबाबत सर्वसहमत सुवर्णमध्य साधावा तसेच आवश्यकता भासल्यास मंत्रीमंडळासमोर सहमतीसाठी पुन्हा प्रस्ताव सादर करण्याचे निश्चित करण्यात आले.त्यानूसार दोन्ही विभागांच्या आकृतिबंधाची फेरतपासणीची प्रक्रीया सुरू असून ज्या प्रभागामध्ये/घटकामध्ये पदे वर्ग करण्याची दोन्हीही विभागाची एकवाक्यता असेल,त्याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे.

२. वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा व मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन शाखेमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांची सेवा उपलब्ध करून देण्यास एकमत झालेले असून मृद व जलसंधारण आयुक्तालयाचे कार्यालय औरंगाबाद येथे स्थलांतरीत होईपर्यंत पुणे येथील कृषि आयुक्तालयाच्या अखत्यारीतील मृद जलसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन शाखेचे कार्यालय तसेच त्या कार्यालयांमध्ये असलेले दस्ताऐवज/नस्त्या क्रमांकासह याद्या भविष्यामध्ये संभ्रम न होण्याच्या दृष्टीकोनातून तयार करण्यात याव्यात.तसेच या संदर्भातील पदांचे अंतिम समायोजन होईपर्यंत कृषि विभागातील संबंधीत अधिकारी/कर्मचारी हे प्रतिनियुक्तीने कोणताही प्रतिनियुक्ती भत्ता अनुज्ञेय न होता कार्यरत राहतील. तथापि मृद व जलसंधारण विभागाचे काम सुरू होण्याच्या अनुषंगाने कृषि विभागांतर्गत मृद व जलसंधारण कामांशी संबंधीत कार्यरत असलेल्या व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेमध्ये कार्यरत असलेली पदे व कार्यालये तसेच त्या संबंधीत इतर काही पदे मृद व जलसंधारण विभागास हस्तांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

कृषि विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन शाखे अंतर्गत मंजूर असलेली सोबतच्या **विवरणपत्र-अ** मधील **९२** पदे तसेच वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेतील कार्यरत असलेली सोबतच्या **विवरणपत्र-ब** मधील एकुण **७७** पदे, संबंधीत कार्यालये, त्यातील फर्निचर,नस्त्या व इतर साधन सामग्रीसह मृद व जलसंधारण विभागास हस्तांतरीत करण्यात येत आहेत.सदर कार्यवाही आयुक्त (मृद व जलसंधारण) व आयुक्त (कृषि) यांच्या देखरेखीखाली पूर्ण करण्यात यावी.याबाबतची नोंद कृषि विभागातील साधन सामग्री नोंदवहीमध्ये (Stock Register)घेण्यात यावी. कृषि विभागातील वरील यंत्रणेमध्ये कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी सध्याप्रमाणेच मृद व जलसंधारण विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात **<u>प्रतिनियुक्तीवर (प्रतिनियुक्ती भत्ता अनुज्ञेय न होता)</u>** कार्यरत रहातील.

२. ज्या अधिकारी /कर्मचा-यांच्या सेवा मृद व जलसंधारण विभागास स्वीकारार्ह वाटतील, असे अधिकारी / कर्मचारी त्या विभागामध्ये हजर झाल्यानंतर आयुक्त (मृद व जलसंधारण) यांनी संबंधितांच्या मूळ सेवापुस्तकांची मागणी आयुक्त (कृषि) यांच्याकडे करावी. आयुक्त (कृषि) यांनी संबंधीत अधिकारी/कर्मचा-यांचे मूळ अद्ययावत सेवापुस्तक, त्या-त्या पदांवर कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नावासहीत यादी करावी व त्यांचे तदर्थचे नाव न लिहीता मूळ पदनाम नमूद करावे तसेच संबंधितांचा सेवार्थ प्रणाली क्रमांक नमूद करून सदर माहीती आयुक्त (मृद व जलसंधारण) यांना उपलब्ध करून दयावी.

३. ज्या अधिकारी / कर्मचा-यांच्या सेवांची मृद व जलसंधारण विभागास आवश्यकता नसल्यास संबंधीत पदे , त्यावरील अधिका-यांसह कृषि विभागास परत पाठविण्याची मृद व जलसंधारण विभागास मुभा असेल.संबंधीत अधिकारी / कर्मचा-यांना कृषि विभागामध्ये परत रुजू करून घेण्याची कार्यवाही आयुक्त (कृषि) यांनी करावी.

४. वरील पदांप्रमाणेच कृषि विभागातील **आरेखक,गट-क** संवर्गातील एकुण **३४** मंजूर पदे(वेतनश्रेणी रु.५२००-२०२००,ग्रेड पे रु.२८००/-) व **अनुरेखक,गट-क** संवर्गातील एकुण **१९७८** मंजूर पदे (वेतनश्रेणी रु.५२००-२०२००,ग्रेड पे रु.२०००/-) अशी **एकुण २१८१ पदे** मृद व जलसंधारण विभागास हस्तांतरीत करण्यात येत आहेत.सदरची पदे हस्तांतरीत करताना सर्व दस्तऐवजांच्या नोंदी घेऊन पंचनामा करण्यात यावा.मृद व जलसंधारण विभागाने संबंधीत कर्मचा-यांना त्या विभागामध्ये रुजू करून घेतल्यानंतर कृषि आयुक्तालयाचा सदर पदांवरील आस्थापना विषयक नियंत्रण/अधिकार संपुष्टात येईल.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७०९१२१३४००८५००१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येतआहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2017.09.12 17:07:49 +05'30'

(सु.सं.धपाटे)
शासनाचे उप सचिव

सोबत : विवरणपत्र अ व **ब**

प्रति,

१) आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
२) आयुक्त (मृद व जलसंधारण),वाल्मी,औरंगाबाद.

प्रतः-

१) मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा.मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
३) सर्व अप्पर मुख्यसचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) प्रधानसचिव (कृषि) यांचेस्वीयसहाय्यक, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
५) सचिव, मृद व जलसंधारण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक,
६) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) सर्व विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती/औरंगाबाद.
८) सर्व जिल्हाधिकारी.
९) मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) पुणे.
१०) सर्व कृषि सहसंचालक व सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
११) मुख्य अभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर.
१२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१३) सर्व अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ पुणे/ठाणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/ अमरावती.
१४) मुख्य दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, औरंगाबाद.
१५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद.
१६) व्यवस्थापकीय संचालक, वाल्मी, औरंगाबाद.
१७) संचालक, मृदसंधारण, पुणे.
१८) सर्व कार्यकारी संचालक/ सर्व महासंचालक, पाटबंधारे विकास महामंडळे.
१९) सर्व मुख्य अभियंते, (स्थापत्त/यांत्रिकी) जलसंपदा विभाग.
२०) सर्व अधिक्षक, अभियंते (स्थापत्य) जलसंपदा विभाग.
२१) सर्व जिल्हा संधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग.
२२) सर्व तालुका मृदसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग.
२३) सर्व मंडळ मृदसंधारण अधिकारी, (जिल्हा परिषद गटाच्या ठिकाणी)
२४) निवडनस्ती, (१५ अे कार्यासन), कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

विवरणपत्र- अ

संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन शाखेतील पदे

अ.क्र.	पदनाम	मंजूर पदे
१	२	३
१	संचालक	१
२	कृषि सह संचालक	१
३	कृषि उप संचालक (वि.वे)	४
४	कृषि उप संचालक (वि.वे.वि)	२
५	म.कृ.से. गट-ब	४
६	स्विय सहाय्यक	१
७	म.कृ.से. गट-ब (कनिष्ठ), कृ.अ.	१०
८	कृषि पर्यवेक्षक	४
९	कृषि सहाय्यक	२
१०	अधिक्षक	१
११	सहाय्यक अधिक्षक	६
१२	वरिष्ठ लिपिक	९
१३	लिपिक/टंकलेखक	१८
१४	अनुरेखक	१०
१५	लघुलेखक (उच्चश्रेणी)	१
१६	लघुलेखक (निम्नश्रेणी)	२
१७	वाहनचालक	४
१८	नाईक/दप्तरी	२
१९	शिपाई	१०
एकूण		९२

विवरणपत्र-ब

वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेतून मृद व जलसंधारण विभागास हस्तांतरीत करावयाची पदे

अ.क्र.	नाव	संवर्ग.	हजर दि.	वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेतील पद
१	श्री.शिवराज घोरपडे	अधिक्षक कृषी अधिकारी	१३.०७.२०१५	सह मुख्य कार्यकारी अधिकारी
२	श्री.ज्ञानेश्वर बोटे	अधिक्षक कृषी अधिकारी	२२.१२.२०१६	सह मुख्य कार्यकारी अधिकारी
३	श्री.रामचंद्र घोळवे	तंत्र अधिकारी	१०.०९.२०१४	तंत्र अधिकारी
४	श्रीमती पुनम कदम रणवरे	कृषी अधिकारी	२२.०७.२०१६	तंत्र अधिकारी
५	श्री प्रमोद डोंगरे	अनुरेखक	३०.०४.२०१०	लेखा सहायक
६	श्री.महेश कचरे	कृषी सहायक	०२.०५.२०१०	कृषी सहायक
७	श्री.राजेश गाडेकर	कृषी सहायक	०९.०३.२०११	कृषी सहायक
८	श्री.गिरीश कुलकर्णी	कृषी सहायक	०४.०६.२०१२	कृषी सहायक
९	श्री. राहुल गांधी	लिपिक	२८.०४.२०१०	लिपिक

जिल्हा स्तरीय कार्यालये

अ.क्र.	नाव	संवर्ग	हजर दि.	वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेतील पद
१	रिक्त पद	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	--	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक ठाणे
२	रिक्त पदे	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	--	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक पालघर
३	श्री.एस.एस.देवकाते,	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	०८.०५.२०१४	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक रायगड
४	श्री.डी.जी.देसाई	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	०१.०६.२०१५	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक रत्नागिरी
५	रिक्त पद	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	--	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक सिंधुदुर्ग
६	श्री.डी.बी.पाटील	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	०५.०६.२०१४	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक नाशिक
७	श्री.डी.के.चौधरी	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	१०.०४.२०१५	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक धुळे
८	रिक्त पद	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	--	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक नंदूरबार
९	श्री.ए.व्ही.भोकरे	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	०१.०७.२०१४	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक जळगाव
१०	श्री.डी.पी.राजपुरे	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	०५.०६.२०१४	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक पुणे

अ.क्र.	नाव	संवर्ग	हजर दि.	वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेतील पद
११	श्री.शिरिष जाधव	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	०२.०६.२०१४	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक अहमदनगर
१२	श्री.रविंद्र माने	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	१७.०७.२०१४	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक सोलापूर
१३	श्री. व्ही.एस. बंडगर	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	१३.०६.२०१७	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक सातारा
१४	श्री.व्ही.ए.पवार	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	१९.०८.२०१४	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक सांगली
१५	श्री.एच.वाय.इंगवले	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	०३.०६.२०१४	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक कोल्हापूर
१६	श्री.पी.बी.चव्हाण	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	०२.०६.२०१४	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक औरंगाबाद
१७	श्री. पी.जी.कुलकर्णी	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	०९.०७.२०१७	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक जालना
१८	रिक्त पद	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	--	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक बीड
१९	श्री.एस.डी.भारती	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	०७.०७.२०१४	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक लातूर
२०	श्री.डी.व्ही.जाधवर	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	१०.०७.२०१४	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक उस्मानाबाद
२१	श्री.विजय एम.हिरेमठ	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	हजर झाले नाहीत	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक नांदेड
२२	रिक्त पद	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	--	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक परभणी
२३	श्री.भास्कर लोंढे	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	१२.१०.२०१५	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक हिंगोली
२४	श्री.के.आर.शिरसाठ	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	१०.४.२०१५	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक बुलडाणा
२५	श्री.बी.पी.किरवले	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	०८.११.२०१६	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक अकोला
२६	श्री. आर.एस.कदम	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	०८.११.२०१६	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक वाशिम
२७	रिक्त पद	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	--	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक अमरावती
२८	श्री.विठ्ठल कर्डीले	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	११.६.२०१५	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक यवतमाळ
२९	श्री.गणेश मांढरे	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	१६.३.२०१५	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक वर्धा
३०	श्री.ए.पी.गायकवाड	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	२१.८.२०१४	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक नागपूर
३१	रिक्त पद	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	--	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक भंडारा
३२	रिक्त पद	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	--	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक गोंदिया
३३	रिक्त पद	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	--	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक चंद्रपूर
३४	वन विभागाचे पद	गट अ कृषी उपसंचालक संवर्ग	--	अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक गडचिरोली

जिल्हा स्तरीय कार्यालये

अ.क्र.	नाव	संवर्ग	हजर दि.	वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेतील पद
१	श्रीमती तृप्ती.एस.वाघमोडे	गट ब संवर्ग	०१.०४.२०१४	उप प्रकल्प व्यवस्थापक ठाणे
२	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक पालघर
३	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक रायगड
४	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक रत्नागिरी
५	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक सिंधुदुर्ग
६	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक नाशिक
७	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक धुळे
८	श्री.आर.एस.महाले	गट ब संवर्ग	०१.०४.२०१४	उप प्रकल्प व्यवस्थापक नंदूरबार
९	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक जळगाव
१०	श्री.के.एस.हसरमणी	गट ब संवर्ग	०१.०६.२०१५	उप प्रकल्प व्यवस्थापक पुणे
११	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक अहमदनगर
१२	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक सोलापूर
१३	श्री.अ.आ.मोरे	गट ब संवर्ग	०४.०६.२०१४	उप प्रकल्प व्यवस्थापक सातारा
१४	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक सांगली
१५	श्री.सुहास पाटील	गट ब संवर्ग	०१.१२.२०१५	उप प्रकल्प व्यवस्थापक कोल्हापूर
१६	श्रीमती एम.ए.पंतगे	गट ब संवर्ग	०९.०५.२०१३	उप प्रकल्प व्यवस्थापक औरंगाबाद
१७	श्री.के.के.घुले	गट ब संवर्ग	०७.०७.२०१४	उप प्रकल्प व्यवस्थापक जालना
१८	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक बीड
१९	श्री.हरिदास मा.नागरगोजे	गट ब संवर्ग	०१.०४.२०१४	उप प्रकल्प व्यवस्थापक लातूर
२०	श्री.कल्याण बा.बगडी	गट ब संवर्ग	०१.०४.२०१४	उप प्रकल्प व्यवस्थापक उस्मानाबाद
२१	श्री.विठ्ठल गिते	गट ब संवर्ग	३०.०४.२०१३	उप प्रकल्प व्यवस्थापक नांदेड
२२	श्री.एम.बी.बीडबाग	गट ब संवर्ग	०१.०४.२०१४	उप प्रकल्प व्यवस्थापक परभणी
२३	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक हिंगोली
२४	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक बुलडाणा
२५	श्री.संजय देशमुख	गट ब संवर्ग	२५.०८.२०१४	उप प्रकल्प व्यवस्थापक अकोला
२६	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक वाशिम
२७	श्रीमती शितल उके	गट ब संवर्ग	२२.०७.२०१४	उप प्रकल्प व्यवस्थापक अमरावती

अ.क्र.	नाव	संवर्ग	हजर दि.	वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेतील पद
२८	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक यवतमाळ
२९	श्रीमती मेधा पाटील	गट ब संवर्ग	२५.०८.२०१४	उप प्रकल्प व्यवस्थापक वर्धा
३०	श्रीमती एल.बी.सैद	गट ब संवर्ग	०१.०४.२०१४	उप प्रकल्प व्यवस्थापक नागपूर
३१	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक भंडारा
३२	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक गोंदिया
३३	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक चंद्रपूर
३४	रिक्त पद	गट ब संवर्ग	--	उप प्रकल्प व्यवस्थापक गडचिरोली